# परिघाबाहेरील माणसांच्या चळवळींचा एकसूत्री आवाज मोठा करण्याची गरज




एकनाथ
पाटील

जागतिकीकरणाचा (नव्या आर्थिक धोरणांचा) स्वीकार करून आज जवळजवळ पाव शतकाचा कालखंड उलटून गेला आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रांवर विविधांगांनी जागतिकीकरणाचे दूरगामी परिणाम झाले आहेत. जागतिकीकरणाच्या स्वीकाराबाबत समाजात आजही परस्परविरोधी दोन मतप्रवाह आहेत. जागतिकीकरणाच्या आगमनाने माणसाच्या जगण्यात अनेक अत्याधुनिक बाबींचा अंतर्भाव झाला, ही गोष्ट खरी आहे. पण या आधुनिकीकरणाने मूठभरांचे जगणे कमालीचे उजळून निघाले आणि बहुसंख्य सर्वसामान्य लोक परिघाबाहेर फेकले गेले. जागतिकीकरणाचे समर्थन करणाऱ्या मूठभर सामर्थ्यवान लाभार्थींकडून जागतिकीकरणाचे फायदे उपटणे आजही सुरूच आहे. पण समाजाच्या तळाच्या स्तरातल्या सर्वसामान्य माणसांच्या जगण्यासमोर मात्र जागतिकीकरणाने अनेक आव्हाने उभी केली आहेत. त्यांचे जगणे दिशाहीन बनले आहे. अशावेळी जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या या आव्हानांवर पुन्हा नव्याने विचारमंथन होण्याची आवश्यकता वाटल्यानेच प्राचार्य विश्वास सायनाकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त या आव्हानांचा शोध घेण्याचे योजिले आणि त्या प्रयत्नातूनच 'जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने' हा ग्रंथ आकारास आला आहे. 'वर्तमान' ही संकल्पना ग्रंथाच्या शीर्षकात गेल्या पंचवीस वर्षांचा कालखंड नजरेसमोर ठेवून वापरली गेली असली, तरी या काळाने निर्माण केलेली आव्हाने केवळ या पंचवीस वर्षांच्या काळापुरतीच मर्यादित आहेत असे नसून, पुढच्या सुमारे शतकभरापेक्षाही अधिक कालखंडावर या आव्हानांचा प्रभाव आणि दूरगामी परिणाम राहणार आहे. परिणामांचे हे कटु वास्तव विचारात घेता आजच्या आणि उद्याच्या काळातले या ग्रंथाचे महत्त्व आणि वेगळेपण अधोरेखित होते.

ईमेल : pwatsaru@yahoo.com

आपली इच्छा असो वा नसो जागतिकीकरणाने आज आपणा सर्वांनाच विद्रूप वास्तवाच्या एका टोकावर आणून सोडले आहे. कितीही प्रयत्न केला तरी आजमितीला या टोकावरून मागे फिरता येणे अशक्य आहे. मात्र आपले सकारात्मक बळ एकवटून या विद्रूप वास्तवाशी संघर्ष करून विषमता नष्ट करता येणे शक्य आहे. जागतिकीकरणाचा सर्वांत मोठा फटका भारतातल्या शेती आणि शेतकरी वर्गाला बसला आहे. 'भारत हा खेड्यांचा शेतीप्रधान देश आहे. या देशातील सुमारे सत्तर टक्के जनता आजही शेतीवर अवलंबून आहे आणि शेती हा या देशाचा आर्थिक कणा आहे' असे सांगितले जाते. जागतिकीकरणानंतरच्या काळातसुद्धा जिथे देशाच्या विकासाचे धोरण ठरते, तिथे खेड्यांना आणि शेतीला फारसे महत्त्व नाही, असे लक्षात येते. खेड्यांचे आणि शेतीचे शोषण करून उभारल्या गेलेल्या उद्योगांना आणि हे उद्योग जिथे उभे केले जातात त्या महानगरांना मात्र विकासाच्या धोरणात कमालीचे महत्त्व असल्याचे दिसून येते. देशाला अन्नधान्याचा पुरवठा करणारी पण आधीच अस्मानी-सुलतानी संकटांनी अडचणीत आलेली शेती जागतिकीकरणानंतरच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे अधिकच अडचणीत आली. शेतकऱ्याच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव मिळत नसल्याने जगण्याची हमी नसलेल्या लाखो शेतकऱ्यांनी मागच्या पंचवीस वर्षांत आत्महत्या केल्या. त्या अजूनही सुरूच आहेत. मात्र गेल्या पाव शतकातल्या कोणत्याही पक्षाच्या भांडवलशाहीधार्जिण्या सरकारांनी शेती आणि शेतकरी जगवता येईल अशा प्रकारचे कोणतेही ठोस कृतिकार्यक्रम आखले नाहीत. परिणामी दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर वाढत गेल्या. याउलट शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन उद्योगधंद्यांना चालना देणारी शेतकरीविरोधी धोरणे मात्र खुलेआम राबविली गेली. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्याचे कंबरडे मोडले. शेतकरी असणं ही एके काळी अभिमानानं सांगायची, प्रतिष्ठेची बाब होती. ती आज मानहानीकारक, अवमानदर्शक बनली आहे. शेती हा एके काळी शेतकऱ्याचा व्यवसाय नव्हता, तर तो त्याच्या जगण्याचाच एक अविभाज्य भाग होता. मात्र साऱ्या जगाचा पोशिंदा असलेल्या आणि गावातल्या साऱ्या उपेक्षित घटकांना सोबत घेऊन जगणाऱ्या शेतकऱ्यासमोर आज त्याच्या स्वत:च्या जगण्याचाच प्रश्न बिकट बनला आहे. त्यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग त्याला दिसत नाही. या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीच्या विरोधात लढण्यासाठी आवश्यक असलेले किमान संघर्षासाठीचे बळ आणि संघटनशक्ती त्याच्याकडे नाही. जगाच्या पाठीवरचे सगळे उपेक्षित घटक एकत्र येऊन आपापल्या हक्कांसाठीचा रस्त्यावरचा आवश्यक संघर्ष करतात. मात्र बारा महिने तेरा काळ अहोरात्र शेतीच्या कामात गुंतलेल्या आणि जगण्याचीच कोंडी झाल्याने सतत विविध प्रश्नांनी घेरलेल्या शेतकऱ्याला त्याच्या ओढग्रस्त जगण्यामुळे अशी सर्वसमावेशक, सर्वव्यापी संघटित शक्ती उभा करता आली नाही. अपवाद वगळता जिथे जिथे असे प्रयत्न झाले, त्यांचा कालांतराने इथल्या राजकीय व्यवस्थेने बळी घेतला आणि शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडण्यात आले. शेतकऱ्यांच्या चळवळी आणि सरकारची शेतीविषयक धोरणे म. फुल्यांनी सांगितलेल्या मार्गाने गेली असती, तर भारतीय शेतकरी आणि शेतीचे चित्र आश्वासक आणि आशादायी निर्माण झाले असते. आपले प्राधान्य प्रामुख्याने शेतीलाच असायला हवे, पण ते आज माहिती तंत्रज्ञानाला (संगणक युगाला) आहे. या दोहोंमध्ये माणसाचे जगणे कोंडीत सापडले आहे. परिणामी शेतीतून जगण्याची कुठल्याही प्रकारची हमी नसल्याने जगण्याच्या संघर्षात हतबल झालेली शेतकऱ्याची नवी पिढी महानगरांकडे सरकली. महानगरात त्यांची अवस्था फार चांगली आहे, असे नाही. तरीही महानगरात हाताला लागेल ती फांदी पकडून अधांतरी लोंबकळत अस्थिर आयुष्य जगत राहण्याशिवाय तिच्याकडे दुसरा पर्याय नाही.

खरे तर खेड्यातली माणसे श्रम करणारी, साधेपणाने जगणारी, अडी-अडचणीला परस्परांच्या मदतीला धावून जाणारी, पशुपक्षी, किडामुंगी, जीवजंतू आणि निसर्गासमवेत समूहभावाने जगणारी. जागतिकीकरणाने त्यांच्या जगण्यालाच विळखा घातला आणि त्यांच्यातला समूहभाव संपला. समूहभावाच्या आधारे वर्षानुवर्षे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत त्यांनी प्राणपणाने जपलेल्या त्यांच्या म्हणून ज्या अनेक बळकट 'ज्ञानपरंपरा' होत्या. जागतिकीकरणाच्या लाटेत त्या उद्ध्वस्त झाल्या. खेडोपाडी उतरंडीच्या गाडग्यात वर्षानुवर्षे पारंपरिक बी-बियाळ्याची जी सकस ज्ञानपरंपरा होती, ती संकरित

बियाण्यांच्या नादी लावून मोडीत काढण्यात आली. आता संकरित बियाणी एक तर उगवून येत नाहीत आणि आली तरी पूर्वीइतका उतारा देत नाहीत; तेव्हा काय करावे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहतो. शेतकऱ्याची सेंद्रीय खतांची पारंपरिक मात्रा मोडीत काढण्याचे षडयंत्र रचले गेले. आम्ही त्या षडयंत्राला बळी पडलो. रासायनिक खतांच्या भरमसाट माऱ्याने जमिनी नापीक झाल्या. जमिनीची प्रत खालावली. शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर त्याचा विपरित परिणाम झाला. आता त्यांची शेती पिकत नाही आणि ती तो विकू शकत नाही. 'इकडे आड तिकडे विहीर' अशी त्याची अवस्था आहे.

एकेकाळी शिवाजी महाराजांसारख्या दूरदृष्टीच्या थोर राज्यकर्त्याने शेतकऱ्यांना कसायला जमिनी दिल्या. गरजेनुसार गुरंढोरं आणि बी-बिवाळा दिला आणि दुष्काळासारख्या संकटाच्या काळात त्यांच्या जगण्याची हमी घेतली. आजचे राज्यकर्ते जगण्याच्या हमीऐवजी सेझ (एसईझेड)च्या नावाखाली गरीब शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी काढून घेत आहेत. पिढ्यान्‌पिढ्या शेतीवर मालकी हक्क असणाऱ्या आणि सर्वार्थाने शेतीवर अवलंबून असणाऱ्या माणसांना भूमिहीन केले जात आहे. त्यातून शेतकरी देशोधडीला लागत आहेत. त्यामुळेच शेतीवर जिवापाड प्रेम करणारी एक पिढी आणि नव्या संकटातून सुटण्यासाठी पिकाऊ जमिनीचे प्लॉट पाडून शेती विकणारी नवी पिढी असा एक दुहेरी संघर्ष आज खेड्यापाड्यात दिसतो आहे. आज शहरांबरोबरच मोठ्या गावाभोवतालच्या बहुतांश जमिनी जागतिकीकरणाने गिळंकृत केल्या आहेत. त्यातून खेड्यापाड्यात अनेक नवे प्रश्न उभे राहताना दिसत आहेत.

शेतीला पूरक उद्योगधंदे निर्माण व्हावेत, जिथल्या तिथे रोजगार उपलब्ध व्हावा आणि खेड्यापाड्यातल्या सामान्य माणसांचे जगणे आर्थिकदृष्ट्या सुसह्य व्हावे, या उदात्त हेतूने खेडोपाडी सहकाराची निर्मिती झाली. ज्या उदात्त हेतूने सहकाराची निर्मिती झाली, त्या हेतूनेच तो पुढे चालला असे नाही. मात्र शेतकऱ्यासह खेड्यापाड्यातल्या सर्वच घटकांना सहकाराच्या माध्यमातून आर्थिक दिलासा मिळाला. सहकारी संस्थाचे जाळे ही ग्रामीण भागाची मोठी ताकद होती. या संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अर्थवाहिन्या होत्या. या संस्थांच्या खासगीकरणाचे डाव जागतिकीकरणात आखले गेले. जनतेचे प्रतिनिधी म्हणून लोकशाही मार्गाने निवडून गेलेले लोकप्रतिनिधीच व्यवस्था हाताशी धरून वैयक्तिक स्वार्थापोटी सहकार मोडीत काढून त्याचे खासगीकरण करण्याचे षड्‌यंत्र रचित आहेत. ग्रामीण माणसांच्या जगण्याचा हक्काचा आर्थिक आधार असलेल्या सहकारी संस्थांवरची सार्वजनिक मालकी नष्ट होऊन, तिचे खाजगीकरण होऊन, तिथे एकाधिकारशाही निर्माण होण्याच्या शक्यतेने खेड्यापाड्यात नवे आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत. परिणामी खेड्यांच्या जगण्यातली सकारात्मक ओल संपुष्टात आली आहे.

जागतिकीकरणाच्या काळात महानगरांपासून वाड्यावस्त्यांपर्यंत घरोघरी संगणक आणि मोबाईल क्रांती पोहोचली. संपर्काची यंत्रणा खूपच सोपी झाली. जगभरातली माहिती घरबसल्या मिळू लागली. जणू सारे जग आपण खिशात घेऊन फिरतो आहोत असा भ्रम माणसाच्या मनात निर्माण झाला. माहितीच्या प्रचंड माऱ्यात व्हॉटसअ‍ॅप, फेसबुक, ट्विटरमुळे दूरवरची परिचय नसलेली कितीतरी माणसं जवळ आल्याचा भास निर्माण झाला. पण प्रत्यक्षात जवळची माणसं दूर कधी गेली, कळालेच नाही. नुसती माणसंच दूर गेली नाहीत, तर पशुपक्षीही माणसांपासून दूर गेले. मोबाईलच्या रेंजसाठी गावा-शहरांच्या उरावर उभ्या केलेल्या टॉवर्समुळे माणसांच्या जगण्याच्या पर्यावरणातून चिमण्या गायब झाल्या आणि माणूस म्हणून त्यांच्या नाहीशा होण्याचे आम्हाला काहीही सोयरसुतक वाटले नाही. पूर्वी नखं काढल्यावर घरातली जुनी-जाणती माणसं काढलेली नखं अंगणात फेकू देत नव्हती. अंगणात फेकलेली नखं खाऊन पोटफाडीच्या आजाराने चिमण्या मरू नयेत, हा व्यापक सहानुभाव त्यामागे होता. आज हा सहानुभाव नष्ट झाला. आमच्या आजच्या शिक्षणाने हा सहानुभाव नव्या पिढीला शिकवला नाही. मूल्य शिक्षणाचा तर बोजवारा उडाला आहे. आमच्या शिक्षणाचे याच काळात मातेरे झाले. जिल्हा परिषदेच्या शाळा मोडीत काढून शहरांपासून खेड्यांपर्यंत इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले. 'शाळा आहे पण शिक्षण नाही' अशी गत झाली. इंग्रजी माध्यमांच्या शाळा म्हणजे 'नोटा छापण्याचे कारखाने' बनले. अशा कारखान्यांमधून 'रोबो' तयार करण्याचे काम केले जाते. परिणामी उद्याच्या पिढीचा मूल्यशिक्षणाशी (पान ६६ वर)

असणारा संबंध संपुष्टात आला.

उच्च शिक्षणाची अवस्था तर याहून बिकट आहे. याच कालखंडात शिक्षणात राजकारणाचा अतिरेकी शिरकाव झाला. शैक्षणिक धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत राजकीय हितसंबंधाचा हस्तक्षेप वाढला. राजकारणातले स्वत:चे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी सत्ता आणि संपत्तीच्या बळावर खिरापत वाटल्यासारखी इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेजे वाटली गेली. उच्च शिक्षण हे 'वारेमाप पैसा कमावण्याचे माध्यम' बनले आणि विद्यार्थी ग्राहक. परिणामी शिक्षण संस्थांना राजकारणाच्या अड्ड्यांचे वाईट स्वरूप प्राप्त झाले. यामुळे प्राथमिक स्तरापासून ते अगदी उच्चशिक्षणापर्यंतच्या अभ्यासक्रमांच्या रचनेकडे दुर्लक्ष झाले. तिथेही अनैतिहासिक आणि संविधानविरोधी शक्तींचा शिरकाव होतो आहे. खरे तर, राजकारण हा प्रांतच मुळी पूर्वी समाजकारणाशी जोडलेला होता. काही एक सामाजिक भान ठेवून सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून समाजासाठी आपणाला काही चांगले करता येईल, या प्रामाणिक विचारापोटी आख्खी पिढीच्या पिढी सेवाभावीवृत्तीने समाजकारणातून राजकारणात येत होती. त्यांच्यात वैचारिक मतभेद होते, पण जीवघेणे संघर्ष नव्हते. आज राजकारणातला सेवाभाव, मूल्यभाव संपला. बाजारपेठ नावाच्या यंत्रणेद्वारे राजकारणात विध्वंसक गोष्टींचा शिरकाव झाला. 'मार्केट सिस्टीम'ने इथली राजकीय व्यवस्था इतकी नासवली की, ती आता दुरुस्तीपलीकडे पोहोचली आहे. पैशाच्या बळावर पाच-पंचवीस डिजिटल होर्डिंग्ज उभी केली की, एका रात्रीत आता कोणालाही नेता होता येते. नेता बनायचे निकषच या काळाने बदलून टाकले. पैशाचा महापूर निवडणुकीतून वाहू लागला. या विधिनिषेधशून्य मार्केटप्रधान राजकारणामुळे, 'राजकारण हा चांगल्या लोकांचा प्रांत नाही' अशी राजकारणाबद्दलची एक नकारात्मक सार्वजनिक मानसिकता सामान्य माणसांची निर्माण होत गेली. परिणामी अपवाद वगळता 'चांगली माणसं' राजकारणाच्या परिघाबाहेर फेकली गेली. खरे तर, राजकारण आज मार्केटला आकार देऊ शकत नाही. उलट मार्केटच राजकारणाला आकार देऊ लागल्याची दुश्चिन्हे अधिकाधिक ठळक होताना दिसत आहेत. सामाजिक प्रश्नांवर लोकांचे, कार्यकर्त्यांचे प्रबोधन करून त्यांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या समाजोपयोगी राजकारणाची परंपरा मागे पडून निवडणुकीचे कॉन्ट्रॅक्ट देण्याची अघोरी पद्धत सुरू झाली, जी लोकशाहीला घातक आहे. निवडणुकीतून पर्यायाने राजकारणातून माणूस बेदखल झाला. इथेही तो ग्राहक बनून मते विकू लागला. त्यामुळे राज्यकर्त्यांना लोकांमध्ये असण्याची, त्यांच्या प्रश्नांशी जोडून घेण्याची आज आवश्यकता वाटत नाही. सामाजिक प्रश्नांऐवजी धार्मिक, जातीय, प्रादेशिक, सांस्कृतिक, भाषिक अस्मिता टोकदार बनवून त्यांचे भांडवल करून निवडणुका कशा जिंकता येतील, याचा अभ्यास करणारी यंत्रणा मार्केटप्रधान व्यवस्थेत क्रियाशील झाली. अशा अघोरी कामाचेही तिला पैसे मिळू लागले आणि नव्वदोत्तर कालखंडातल्या राजकारणाचा खेळखंडोबा झाला. परिवर्तनवादी-क्रांतिकारी राजकारणाची जागा आज कॉर्पोरेट राजकारणाने घेतली. लोकांसाठी काही करण्याचा आव आणून केल्या जाणाऱ्या लोकानुरंजनवादी राजकारणाने लोकशाहीचा डोलारा पोकळ बनवला. परिणामी उपेक्षित, वंचित घटकांच्या न्याय्य हक्कांची हमी धूसर बनत गेली. गेल्या पाव शतकाच्या काळातल्या अराजकीय स्वरूपाच्या राजकारणाच्या प्रारंभामुळे दडपलेल्या साऱ्या असंघटित क्षेत्रातल्या वंचित समूहांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सामान्य माणसाला चेहराच राहिला नाही. तो चेहराहीन बनला. त्याचे प्रश्न घेऊन थेट रस्त्यावर उतरून लढणाऱ्या चळवळीही या कालखंडात क्षीण होत गेल्या. ज्यांना मुळातच आवाज नाही, अशा राबणाऱ्या माणसांचा आवाजही सर्वार्थाने दाबला जाईल अशीच रणनीती जागतिकीकरणात आखली गेली. जागतिकीकरणाच्या गदारोळात एकीकडे माणसं व्यक्तित्वहीन होत असताना, दुसरीकडे मात्र आपापले छुपे अजेंडे घेऊन अशी व्यक्तित्वहीन माणसं एकत्र आल्याने; निर्माण झालेल्या वेगवेगळ्या समूहांना आणि जात समूहांच्या अस्मितांना कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. याबाबतीतले पडद्यामागचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि जातीय राजकारण नीट समजून घेतले पाहिजे. जातिअंताच्या लढाईचा, समतेची भाषा बोलणाऱ्यांचा विधायक आवाज दाबून टाकून सर्वच लहान-मोठ्या जातसमूहांनी आपापल्या जातीचा आवाज अधिकाधिक तीव्र आणि टोकदार करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. परिणामी जातिअंताची लढाई बाजूला पडून,

जाती बळकट करणाऱ्या आवाजांचा अतितीव्र कल्लोळ या कालखंडात टीपेला पोहोचला आहे. माणसामाणसांतील सर्वच प्रकारचे अंतर वाढवायला तो कारणीभूत ठरतो आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या भेदांचे विसर्जन करून माणूस म्हणून एकत्र येण्यातला तो मोठा अडसर ठरतो आहे. सर्वच लहान मोठ्या जातसमूहांकडून जातकेंद्री विचार अधिक घट्ट करण्याचे राजकारण केले जात आहे.

खरे तर, मानवी श्रम हे मूल्याची आणि मूल्यांचीही निर्मिती करीत असतात आणि त्यातूनच एका नैतिक समाजाची उभारणी होत असते, याकडे याकाळात प्रचंड दुर्लक्ष झाले. जागतिकीकरणाच्या काळात मानवी श्रम गृहीत धरून त्याचा गैरवापर होऊ लागला. मोठ्या प्रमाणावर मानवी श्रमाची चोरी आणि शोषण वाढले. मूल्य आणि श्रमाचा असणारा संबंध जाणीवपूर्वक तोडण्यात आला. मुळात नैतिकता ही बाबसुद्धा जागतिकीकरणात शोषणाचे हत्यार म्हणून वापरली जाऊ लागली, त्यामुळे 'नैतिक असणे' ही गोष्ट लोकांना गैरसोयीची वाटू लागली. नव्वदीनंतर एकीकडे भौतिक समृद्धीची सूज मोठ्या प्रमाणावर फुगत गेली आणि दुसरीकडे माणसामाणसांतला कळवळा संपला. नाती तुटत चालली, मानवी नात्यांचे वस्तुकरण झाले, संवाद हरवला. आपल्या जगण्याच्या पर्यावरणातल्या अनेक चांगल्या गोष्टींची नासाडी करणारे कितीतरी विषाणू सर्वत्र घुसले आहेत. त्यांनी माणसांचे जगणेच करप्ट करून टाकले आहे. डोळ्यांना प्रत्यक्ष दिसत नसणाऱ्या पण आपल्या सभोवतालात अस्तित्वात असणाऱ्या या प्रकारच्या कितीतरी यंत्रणा आज कार्यरत आहेत आणि माणसे आंधळी, बहिरी, मुकी आणि विचारहीन बनावीत यासाठी या यंत्रणा काम करीत आहेत. कारण माणसांच्या विचारहीन असण्यातच त्यांचे अनेक प्रकारचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे माणसांनी एकतर विचारच करू नये किंवा विचार करायला त्यांना उसंतच मिळू नये, अशा प्रकारची वातावरणनिर्मिती जाणीवपूर्वक निर्माण केली जात आहे. संभ्रम आणि संशय हे या काळाचे सार्वत्रिक वास्तव आहे.

नव्वदीनंतर खेड्यापाड्यांसह नगरा-महानगरांवर जागतिकीकरणाचा बुलडोझर फिरला आणि माणसांची नैतिक उंची भुईसपाट झाली. सगळ्याच गोष्टींचे सपाटीकरण आणि बकालीकरण झाले. एकीकडे माणसांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागल्याचे चित्र निर्माण झाले. तर दुसरीकडे माणसांच्या भावनिक आणि मानसिकतेला तडे गेले. डोळे दिपवणाऱ्या सुधारणा झाल्या. संगणक, मोबाईल खेडोपाडी पोहोचले. सुधारणा झाल्याचे हे चित्र काही अंशी लाभदायकही वाटले. मात्र जागतिकीकरणाने माणसाच्या हाती सोपवलेल्या तंत्रज्ञानासारख्या शस्त्राचा वापर कसा करावा, हे न कळाल्याने लोकांच्या जगण्यात माणुसकीच्या, मूल्यांच्या पातळीवरचे अनेक प्रश्न अधिक तीव्र बनले. विज्ञान-तंत्रज्ञान माणसाला नैतिक अशा अंतिम मानवी सत्याकडे घेऊन जाईल, हा आशावादही या काळाने खोटा ठरवला. विज्ञान-तंत्रज्ञानही अनैतिक आणि अनिर्बंध बनत निघाले आहे. परिणामी माणसाला आभासी दुनियेच्या नादी लावण्यात आले. भ्रमजाल निर्माण करणे, हा या काळाचा विशेष आहे. आभासी दुनियेतल्या हाय प्रोफाईल जीवनशैलीचे स्वप्नाळू चित्र उभे करून अशा फसव्या चित्राच्या प्रेमात त्यांना पाडण्यात आले. अशक्यप्राय असणाऱ्या या चित्रामागे धावताना माणसाचे ग्राहकात रूपांतर कधी झाले, कळालेच नाही. आपण बाजारात जाऊन काय विकत घ्यावे; हे आपल्याही नकळत, आपल्या परस्पर कोणीतरी ठरवित आहेत आणि आपण त्याला बळी पडत आहोत. यात माणसांची सर्वच पातळ्यांवर दमछाक तर झालीच, पण माणसाचे सर्व स्तरांवर कंगालीकरण झाले आणि दुसरीकडे त्याच्या खिशात फार काही नाही पण एक रुपया जरी असेल, तर तोही काढून घेण्याच्या यंत्रणा राबविल्या गेल्या. कोणत्याही मार्गाने 'पैसा कमावणे' हाच या युगाचा मंत्र आहे. त्यामुळे स्वत:चे आर्थिक बस्तान बसवू इच्छिणाऱ्या जागतिकीकरणाच्या समर्थक संस्कृतीने आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक बलवान होता यावे, म्हणून 'पाऊच संस्कृती' अस्तित्वात आणली आणि खिशात एक रुपया असलेल्या गरिबातल्या गरीब माणसालाही नागवले. त्यालाही जागतिकीकरणाने विळखा घातला. मानवी समूहाला सुंदर दिसणारी, मोहात पाडणारी गुलामीची विषारी रोपं विकणं सुरू आहे.

'सबसे बडा रुपया' हे या काळाचे सूत्र आहे. तो मिळवण्यासाठी साम, दाम, दंड, भेद यांचा अतिरेकी वापर सुरू झाला. न्याय-अन्याय या कल्पना मागे पडत गेल्या. पैशाच्या, सत्तेच्या, दहशतीच्या बळावर

‘न्याय हिसकावणे’ किंवा ‘अन्यायालाच न्याय’ म्हणून कायद्याच्या चौकटीत बसवणे सुरू झाले. परिणामी विकास गेला खड्ड्यात, निव्वळ ओरबाडणे सुरू झाले. ‘बक्कळ पैसा मिळवावा’ ही वृत्ती वाढीस लागली. या सगळ्यात सामान्य माणूस वेठीला धरला जाऊ लागला. त्याला कुणी वालीच उरला नाही. दुसरीकडे ज्या निसर्गावर माणसाचे संपूर्ण जगणे अवलंबून आहे त्या निसर्गाची वारेमाप लूट सुरू झाली. निसर्ग हा मूल्यनिर्मितीतला महत्त्वाचा घटक आहे हे जागतिकीकरणाच्या काळातला माणूस विसरला. त्यातून पाण्याची, वाळूची, जंगलांची, खनिजांची आणि मातीचीही लूट मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. सरकारी यंत्रणेला हाताशी धरून ‘टक्केवारी संस्कृती’तून ठेकेदार गब्बर झाले. ज्यांनी हे निसर्गधन सांभाळायचे तेच लोक या ‘टक्केवारी संस्कृती’ला शरण गेले आणि इथले निसर्गचक्रच त्यांनी उलटे फिरवले. निसर्गाच्या या लुटीचा इथल्या हवामानावर, पर्जन्यमानावर पर्यायाने लोकांच्या जगण्यावर विपरित परिणाम झाला. परिणामी शेती बकाल झाली. शेतीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अवलंबून असलेली माणसं जगण्यातूनच विस्थापित झाली.

पूर्वी जंगलांचे आणि जंगली प्राण्यांचे जगणे जे माणसाने मान्य केले होते; ते जंगलतोडीमुळे, खनिजांच्या उत्खननामुळे, शहरीकरणाच्या आक्रमणामुळे आज अमान्य केले गेले. जंगली प्राण्यांच्या मुक्तविहाराची कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता, व्यवस्थेनेच त्यांच्या अधिवासावर अतिक्रमण केले. आज हे प्राणी मानवी वस्त्यांवर हल्ले करीत आहेत. अनेक जंगली इलाख्यात बॉक्साईट अथवा तत्सम खनिज उत्खननांच्या खाणीचे काम मोठ्या प्रमाणावर चालते. हे करताना ज्यांचे संपूर्ण जगणे त्या निसर्गावर अवलंबून आहे, त्या स्थानिक म णसांना आणि जंगलातल्या प्राण्यांना विश्वासात घेतले गेले नाही. अशा उत्खननातून औषधी वनस्पतींच्या अनके दुर्मीळ प्रजाती नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे देशी औषधांची इथली ज्ञानपरंपरा संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक वनीकरणाच्या अथवा ‘इको व्हिलेज’, ‘इको सिटी’च्या नावाखाली इथल्या पर्यावरणाशी कोणत्याही अर्थाने नाते नसणारी, ज्या झाडांवर घरटे बांधणे सोडाच पण क्षणभरासाठी इथले पक्षीसुद्धा बसत नाहीत, अशी कितीतरी बिनकामाची झाडे प्रचंड पैसा खर्च करून इथे आणून लावली जात आहेत. आमची झाडे आम्ही नष्ट केली. निसर्गवाचनात, त्याला समजून घेण्यात आम्ही कमी पडलो. स्वत:च्या स्वार्थासाठी जंगलांवरच आम्ही आक्रमण केले.

उपलब्ध पाण्याची माणसाने वारेमाप उधळपट्टी केली. पर्जन्यमान वाढावे यासाठीच्या पर्यायी उपाययोजना केल्या नाहीत, उलट वाळूची लूट केली. जमिनीच्या गर्भातल्या पाणीसाठ्याला धक्के दिले. तिच्या गर्भात खोल कूपनलिका खोदून तिचे गर्भाशय शोषून कोरडे केले आणि पाण्याचे नैसर्गिक स्रोत संपवले. परिणामी अलीकडे वारंवार दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे हे भीषण चित्र असताना, उपलब्ध पाण्याच्या नियोजनाचा प्राधान्यक्रम बदलण्याचे षड्यंत्र रचले गेले. हे षड्यंत्र कोणाच्या हितासाठी रचले जात आहे, हे मुळातून समजून घेण्याची आवश्यकता आहे. या नीतीमुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडल्या. यापूर्वीही दुष्काळ पडले, शेती तोट्यात जाण्याचा अनुभव शेतकऱ्याला आजचा नाही. पण आजच्या इतके शेतकरी पराभूत आणि निराश कधीच झाले नव्हते. संत तुकारामांच्या काळातही मोठा दुष्काळ पडला होता. माणसांची अन्नान्न दशा झाली, पण पराभूत मानसिकतेने शेतकऱ्यांनी स्वत:हून आत्महत्या केल्याची नोंद जुन्या दप्तरात कुठेही सापडत नाही, याचे उत्तर शिवाजींच्या शेतीविषयक धोरणात सापडते. आजच्या सरकारांची शेतीविषयक धोरणे शेतकऱ्याला अधिकाधिक संकटाच्या खाईत ढकलणारी आहेत.

१९९० सालाला भारताच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. नव्वदीच्या टप्प्यावर आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत स्तरावर प्रचंड उलथापालथी झाल्या. खुल्या आर्थिक धोरणाच्या स्वीकाराचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रांबरोबरच व्यापार, आंतरराष्ट्रीय संबंधांवर आणि या सगळ्याचाच अंतिमत: माणसाच्या जगण्यावर अनेक अंगांनी परिणाम झाला. माध्यमक्रांतीमुळे कालचेच नव्हे तर अगदी आताचे वर्तमानसुद्धा लगेचच शिळे बनायला लागले. ‘कर लो दुनिया मुठ्ठी में’ असे साम्राज्यवादी स्वप्न पाहणारी पिढी याच काळात सक्रिय झाली. तिने जुनी मूल्यरचना मोडीत काढायला सुरुवात केली. तिच्या गतिमान जीवनशैलीनेच तिची बाजारशरण

मानसिकता निर्माण केली. माहिती आणि ज्ञान यातला फरक तिने नीट समजून घेतला नाही. माहितीलाच ज्ञान समजण्याचा किंवा माहितीला 'ज्ञान' संकल्पनेत बसविण्याचा घोटाळा तिने केला. ज्ञान आणि मूल्यांचा संबंध तोडून तिने माहितीची पैशाशी सांगड घातली. पैसा आणि प्रतिष्ठेसाठी व्यवस्था वापरता वापरता त्याच व्यवस्थेचे आपण कधी गुलाम झालो, हे तिचे तिलाही कळाले नाही. 'डिजिटल लँग्वेज' समजणारे आणि न समजणारे अशी माणसांची एक नवी वर्गवारी याच काळात निर्माण झाली. 'डिजिटल लँग्वेज' न समजणाऱ्यांचे जगणे बेदखल ठरवण्यात येऊ लागले. नव्वदीनंतरचे वर्तमान हे विखंडित वर्तमान आहे. याच काळात अस्मितांचे तुकडे पडले. टोकदारपणा वाढला. अनेकरेषीयता वाढली. वर्तमानाचे अन्वयार्थ लावता येणे अशक्य बनले. नव्वदनंतरचा काळ अधिक गहिरा आहे. या काळातच माणसांच्या जाणिवांमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाच्या काळात भौतिकदृष्ट्या जग खूपच जवळ आले. माध्यमक्रांतीमुळे दळणवळणाची संपर्काची साधने मोठ्या प्रमाणावर वाढली. या साधनांचा ओघ आणि वेगही तितकाच मोठा आहे. तंत्रज्ञानाच्या या वेगवान प्रगतीमुळे जगभराच्या कानाकोपऱ्यातली माणसे एकमेकांशी कनेक्टेड झाल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र भावनिकदृष्ट्या ती कधीच डिसकनेक्ट झाली. याच काळात गर्दीत असूनही माणूस एकाकी पडला. त्याच्या मनाचे तुकडे पडले. मानसिक ताणतणावांचे व्यवस्थापन करणे त्याला अशक्य बनले. परिणामी त्याचे मानसिक आरोग्य बिघडले. मानसिकदृष्ट्या अस्वस्थ अथवा विकलांग असणाऱ्यांचे या काळातले शेकडा प्रमाण शोधले तर ते धक्कादायक आहे. माध्यमक्रांतीच्या काळातील साधनांनी निर्माण केलेल्या विकासाच्या ताणामुळे कितीतरी माणसं आज निराशेच्या गर्तेत सापडत आहेत.

तिकडे कोसो मैल दूर अमेरिका, इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत काही चढउतार आले की, त्याचे थेट पडसाद इकडे भारतभर उमटायला लागले. त्यामुळे महानगरांतील कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये 'पॅकेज संस्कृती'त नोकऱ्या करणाऱ्या नव्या पिढीचे जगणे अस्थिर बनले. आधीच आपले माणूसपण विसरून आर्थिक स्पर्धेत यंत्राच्या गतीने धावणाऱ्या तरुणाईला अस्थिरतेचे हादरे पेलवेनासे झाले. या हादऱ्यांचा थेट परिणाम त्यांच्या वर्तमानावर होतो आहे. या साऱ्याचेच अन्वयार्थ लावणे कठीण बनले. कारण आणि परिणाम यांच्यातला परस्परसंबंध न कळणारा हा 'संभ्रमाचा काळ' आहे. आपल्या जगण्यावर वळ उठताहेत; पण ते कशाचे आहेत, हे लोकांना कळेनासे झाले. एकीकडे भौतिक प्रगतीच्या चढत्या आलेखाचा डोळे दिपवणारा झगमगाट दिसत असला तरी; त्यात माणूस नेमका कुठे आहे, कळेनासे झाले. विज्ञान-तंत्रज्ञान-साहित्य-कला या बाबतच्या माणसाने पाहिलेल्या सुंदर स्वप्नांचा भ्रमनिरासच आज माणसाच्या वाट्याला आला आहे.

प्रसारमाध्यमांमध्ये या काळात अनेक पटींनी झालेली वाढ आणि त्यांच्या ध्येयधोरणांमधला लक्षणीय बदल तर अंगावर येणारा आहे. लोकशाहीचा 'चौथा स्तंभ' म्हणून कमालीचे महत्त्व असलेल्या प्रसारमाध्यमांच्या व्यवस्थाशरण वृत्तीमुळे तर त्यांच्या विश्वासार्हतेबाबतच आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खरे तर, माणसांच्या समाजाचे 'ग्राहक समाजात' रूपांतर करण्यात प्रसारमाध्यमांची कळीची भूमिका निभावलेली आहे. चॅनेल्सकडून परस्परविरोधी अशा अनेक गोष्टींचा मारा एकाच वेळी आजही सुरू आहे. पाच मिनिटे बघवत नाही, दहा मिनिटे ऐकवत नाही, तरीही बघणे-ऐकणे सोडवत नाही. त्यामुळे चॅनल्स बदलत राहून त्याच जगात गुंतून राहणे, हा माणसाचा स्थायीभाव झाला आहे. नको असलेल्या अनेक गोष्टी चॅनेल्समधून घरात, घरातून मनात आणि मनातून मेंदूत स्थिर झाल्या. माणसांचे जगणेच त्यांनी नियंत्रित केले. चॅनेल्समधल्या भासमय चंगळवादी जगाच्या माणसे इतकी आहारी गेली की, ती आपले खरे जगणे आणि त्यातला आनंद गमावून बसली. असंख्य चॅनेल्समधून आपल्यापर्यंत जे पोहोचते त्यातले खरे काय, खोटे काय किंवा यापैकी काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे याचा निर्णय लावता येणे कठीण बनले. माध्यमांनी माणसांना झापडबंद बनवलं आहे. विचार करायला या काळाने संधीच ठेवली नाही. मेंदू बधिर करून, गरगरून टाकणारे या काळाचे वर्तमान आहे. 'दाग अच्छे होते है' अशी या काळाची उद्घोषणा आहे. अनैतिक गोष्टी अभिमानाने मिरवल्या जात आहेत. नैतिक जगणाऱ्यांची कोंडी होते आहे.

नैतिक कल्पना उराशी कवटाळून प्रामाणिक जगणाऱ्या माणसाला या काळाने घेरले. त्याचे 'माणूस' असणे या व्यवस्थेच्या दृष्टीने गैरसोयीचे असल्याने त्याचे माणूसपण गिळंकृत करून त्याला 'ग्राहक' बनवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. त्याच्या जगण्याच्या, सौंदर्याच्या कल्पना बदलवल्या गेल्या. स्त्रीकडे तर माणूस म्हणून न पाहता उत्पादन व्यवस्थेच्या प्रदर्शनातील सादरीकरणाची वस्तू म्हणून पाहिले जाऊ लागले. काही सेकंदांसाठी तिचा सुंदर चेहरा विकून पैसा कमावणारी 'जाहिरात संस्कृती' याच काळात बोकाळली. टीआरपीनुसार माध्यमं जाहिरात कंपन्यांना ऑडियन्स विकू लागली. माध्यमांच्या या परस्परविरोधी माऱ्याने उजळमाथ्याने माणसांनी विकृत जीवनशैलीची वाट धरली. एक प्रकारचे सपाटीकरण आणि बकालीकरण सुरू झाले. या काळाचे सत्य एका माणसाला कळेनासे झाले आणि वेगवेगळ्या माणसांनी आपापल्या परीने शोधलेल्या सत्याचा एकमेकांशी संबंध जोडणे अवघड बनले. सत्यासाठी किंमत मोजायची धमक लोकांमध्ये उरलेली नाही. सत्य शोधणाऱ्यांच्या वाट्याला बंदुकीच्या गोळ्या येत आहेत. लोकांची अस्वस्थता वाढली आहे, पण आपण अस्वस्थ का आहोत, हे लोकांना कळेनासे झाले आहे. समूहात राहूनही माणसे एकाकी जगत आहेत. अर्थशून्यता, विसंगती, असंबद्धता, केंद्रहीनता, तुटकपणा, अस्थिरता, अतार्किकता आणि असंगतता ही या काळाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या काळाचे वास्तव गुंतागुंतीचे, अनाकलनीय आणि विखंडित आहे. ते समजून कसे घ्यायचे, हा अनेकांसमोरचा प्रश्न आहे.

जागतिकीकरणाचा प्रश्न केवळ शेती, अर्थकारण, औद्योगिकरण, सहकार आणि शिक्षण यांच्याशीच संबंधित आहे असे नाही. साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही त्याने प्रचंड मोडतोड केली आहे. श्रम करणारा कष्टकरी वर्ग संस्कृती घडवित असतो. वाङ्मय आणि कला जीवनाच्या चित्रणाबरोबरच जीवनाचा अर्थ समजून सांगण्याचा प्रयत्न करतात. परिवर्तनाचं वैचारिक साहित्य जीवनाला दिशा देण्याचा प्रयत्न करतं. माणसाला घडविण्यात योगदान असणारे हे सारेच घटक आज मोडीत काढण्याचे राजकारण सुरू आहे. प्रख्यात हिंदी साहित्यिक पुरुषोत्तम अग्रवाल काही दिवसांपूर्वी 'आज अगर कबीर होते' या विषयावर पुण्यात बोलताना म्हणाले होते, 'न जाने कल आपके हसनें का हिसाब मांगा जाएगा । आपके हसनें से देश की छबी बिघड रही है । वो लम्हा दूर नहीं है । एक एबसर्डीस्तान के माहोल में हम रह रहे हैं । आज अगर कबीर होते, तो एक तो वे जेल मे होते । नहीं तो, पागलखाने में होते । तिसरी जगह उनके लिए नहीं होती ।' आजच्या काळात लिहिणाऱ्या लेखक-कलावंतांसाठी अग्रवाल यांनी दिलेला हा सूचक इशारा आहे. त्या त्या काळाचे अर्थनिर्णयन करण्याचे काम त्या त्या काळातले लेखक-कलावंत करीत असतात. कोणताही लेखक-कलावंत आपल्या कलेतून जे रचित रचतो, ते त्याचे एकट्याचे नसते ते त्याने त्याचा भूतकाळ, वर्तमान, भोवताल, इतिहास, परंपरा, संस्कृती, भाषा, भूगोल अशा अनेक घटकांतून घेतलेले असते. मात्र इतिहासाचा, तत्त्वज्ञानांचा आणि माणुसकीचा अंत करणारा हा काळ असल्याने या काळातल्या घटिताचा नीट अन्वयार्थ आजच्या काळातल्या लेखक-कलावंतांनाही लावता आला नाही. कोणताही चांगला लेखक-कलावंत मानवी हितसंबंधाचे व्यापक पातळीवरचे विधायक राजकारण आपल्या कलेतून करीत असतो. त्याने ते करावे, असेही अपेक्षित असते. लेखक-कलावंतांनी व्यवस्थेत हस्तक्षेपाची भूमिका घेतली पाहिजे. मात्र बाजारसंस्कृतीला कमालीचे महत्त्व देणाऱ्या या कालखंडाचे अर्थनिर्णयन करताना आजचे लेखक-कलावंतही सैरभैर झालेले, आपले व्यापक विधायक राजकारण विसरलेले दिसतात. तुकड्यातुकड्यांनी ते या काळाचे विश्लेषण करताना दिसतात. अख्खा सभोवताल त्याच्या पेच आणि ताणतणावांसहित आकलनाच्या कक्षेत पकडण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. त्यामुळे अपवाद वगळात माणुसकीच्या पातळीवरचे सामान्य माणसांचे प्रश्न कलांमधूनही हद्दपार होताना दिसतात. कलांमधून दुःख विकून पैसा मिळविण्याचा नवा

**बीड**
प्रतिनिधी

**विशाल गोरे**
भ्र. ९५४५५२८८०२

फंडा अस्तित्वात येताना दिसतो आहे. त्यामुळे कोणत्याही कलाकृतीचं विश्लेषण करताना त्या त्या प्रतिभेच्या मागे कोणतं छुपं राजकारण दडलेलं आहे काय, हेही नीट तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. अपवाद वगळता आपले बहुतांश हिंदी चित्रपट आज जागतिक टुरिझमच्या पॉलिसीला बळी पडताना दिसतात. कलाव्यवहारच जागतिकीकरणाला शरण जाताना दिसतो आहे. कोणत्याही कलावंताची मांडणी जोवर व्यवस्थेच्या हिताला बाधा आणत नाही; तोवर व्यवस्थेला अडचण नसते, पण ज्यावेळी कलावंत आपल्या कलेतून व्यवस्थेलाच आव्हान देतो, तेव्हा व्यवस्था दडपशाहीचे राजकारण करते. जागतिकीकरणाचे हितसंबंध जपू पाहणारी सत्तासंस्कृती दडपशाहीचे राजकारण करीत असल्याची कितीतरी उदाहरणे आज जगभर अनुभवास येत आहेत. 'चार्ली हेब्दो' साप्ताहिकावरील हल्ला, आपणाकडील पेरुमल मुरुगन या तमिळ भाषिक लेखकाने व्यवस्थाविरोधी लेखन केल्यामुळे धमकावल्याने त्याला स्वत:तल्या लेखकाला स्वत:हून मृत घोषित करावे लागणे, ही अशा दडपशाहीची काही ठळक उदाहरणे आहेत. शबरीमलाममध्ये स्त्रीची पवित्रता तपासण्यासाठी जागतिकीकरणात स्कॅनिंग मशीनची मागणी केली गेली. मासिक पाळी ही जगातली सर्वांत पवित्र गोष्ट. नवसर्जनाच्या आधीची पूर्वावस्था, कोणत्या निकषांवर अपवित्र ठरवली? हीसुद्धा एकप्रकारची दडपशाहीच आहे. एकीकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, दुसरीकडे सांस्कृतिक दडपशाहीच्या काळातील जगातील बलाढ्य भाषांच्या भाषिक दादागिरीमुळे जगभरातल्या परिघाबाहेरील वंचित समूहांच्या संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करणाऱ्या कितीतरी भाषा नष्ट झाल्या आहेत. शिवाय कितीतरी भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी अशा भाषांच्या संस्कृतीही नष्ट होण्याच्याच मार्गावर आहेत.

जे कलाव्यवहाराच्या बाबतीत तेच वैचारिक क्षेत्रातही सुरू आहे. आपल्या वर्चस्वाला बाधा आणणारे विचार दडपण्याची कटकारस्थाने सुरू आहेत. 'संस्कृती' आणि 'धर्म' हे घटक आज वर्चस्वाचं रणक्षेत्र बनवले गेले आहेत. धर्म आणि संस्कृतीच्या स्वयंघोषित ठेकेदारांनी संस्कृतिरक्षणाच्या नावाखाली सामान्य लोकांची घोर फसवणूक सुरू केली आहे. एका बाजूला लोकांच्या मनातील धर्मश्रद्धांचा वापर करून मार्केटिंग सुरू आहे आणि दुसऱ्या बाजूला परंपराचे गौरवीकरण आणि सोयीच्या जुन्या मिथक आणि प्रतीकांच्या उदात्तीकरणातून लोकांच्या मनात भयगंड निर्माण करून संस्कृतीसत्तेचे वर्चस्व निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. माणसाला निश्चित वाटणारं तत्त्वज्ञान आणि वैचारिक श्रद्धा उखडून टाकल्या जात आहेत. बेबंदशाही वाढवून फायदा उपटायचा, धर्माच्या नावावर जगभर हैदोस मांडून लोकांचे लक्ष विचलित करायचे. वैश्विकतेची भाषा बोलायची आणि संकुचित अस्मिता कुरवाळायच्या असे सारे सुरू आहे. मानवतावाद वगैरे मूल्य फिजूल ठरवली जात आहेत. संस्कृती आणि धर्मामध्ये हितसंबंध गुंतलेली आणि त्यामुळे या दोहोंची चिकित्सा नको असलेली 'फॅसिस्ट' व्यवस्था या काळात उजळमाथ्याने सक्रिय झाल्याचे दिसते आहे. तिला विरोध करणारे देशद्रोही आणि गपगुमान तिच्या मागून जाणारे देशभक्त अशी वर्गवारी केली जाते आहे. तिला विचार करणारे, चिकित्सा करणारे, प्रश्न विचारणारे लोक नको आहेत. यातूनच प्रश्न विचारून समाजाला विधायक, वैचारिक दिशा देणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. एम. एम. कलबुर्गी या विचारवंतांच्या हत्या याच काळात घडवून आणल्या आहेत. जगभर फिरताना अहिंसेचे तत्त्वज्ञान जगाला समजून सांगणाऱ्या म. गांधीजींच्या नावाचा जयघोष करायचा आणि वाहवा मिळवायची आणि त्याचवेळी देशात मात्र म. गांधीजींच्या हत्येचे समर्थन करणारे नाटक उजळमाथ्याने रंगमंचावर आणण्याचे गलिच्छ राजकारण करायचे. रंगमंचावरील गांधींच्या खुनानंतर टाळ्यांचा कडकडाट करायचा अशी डुप्लिसीटी सुरू आहे. शिवाय, 'आमच्या गोटात प्रश्न विचारले जात नाहीत. फक्त आदेश पाळले जातात' असे फॅसिझमचे उदात्तीकरण करायचे. मानवतेच्या दृष्टीने हे धक्कादायक आणि धोकादायक आहे. जगभरात हिंसेचे समर्थन सुरू आहे. पाशवी सत्ताकांक्षेच्या बळावर सुरू असलेली ही हिंसा माणसाच्या नाशाला कारणीभूत ठरणारी आहे.

न दिसणारा, न कळणारा एक अक्राळविक्राळ ऑक्टोपस आपले जगणे गिळंकृत करतो आहे. माणूस इतका त्याच्या प्रभावाखाली आहे की, स्वत:च्याही नकळत तो स्वत:चाच शत्रू म्हणून कधी उभा राहिला,

हे त्याचे त्यालाही कळाले नाही. माणसाच्या जगण्यावर सतत कसलीतरी दहशत असण्याचा, मनावर असंख्य दडपणे असण्याचा आणि सगळेच अस्वस्थ असण्याचा पण आपण अस्वस्थ का आहोत, हे न कळण्याचा हा काळ आहे. प्रत्येकाच्या अस्वस्थतेची कारणे वेगवेगळी असली, तरी जगभरात अस्वस्थता कायम आहे. एकूण माणसांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे आणि त्यासाठीच्या संघर्षाचा हा कालखंड आहे. माणूस म्हणून सतत आपण कसल्यातरी नियंत्रणाखाली, दडपणाखाली आहोत. सतत आपल्यावर कोणीतरी जणू नजर ठेवून आहे, असे सभोवतालचे वातावरण आहे. तुम्ही काय खावं, काय लिहावं, काय बोलावं, कपडे कोणते घालावेत हे ठरवणारी अदृश्य सेन्सॉरशिप कार्यरत झाली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि वैचारिक क्षेत्रात बदलाचा नवा विचार मांडणाऱ्या कार्यकर्ते, लेखक, कलावंत आणि विचारवंतांना भावना दुखावल्याचे दुधारी शस्त्र पुढे करून धमकावले जात आहे. संविधानाने त्यांना बहाल केलेल्या विचारस्वातंत्र्याची गळचेपी सुरू आहे. तिकडे मेळघाटात कुपोषणाने लहान लहान मुलं मरत असताना, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अद्यापही थांबलेल्या नसताना आणि देशातल्या शेवटच्या माणसाला अजूनही पोटभर अन्न मिळत नसताना लोकांच्या भावना कशा दुःखावतात? त्यांचा विवेक कसा दुखावत नाही? हा प्रश्न मला छळतो. सर्वांगानी माणूसपण संपवले जात असल्याच्या या दिशाहीन काळात अजूनही वेळ गेलेली नाही, असे मला वाटते. संघर्षाने साचलेपण नष्ट होते. नवे कोंब फुटतात. कोंडी फुटते, नवी पायवाट तयार होते आणि तिचे मोठ्या प्रवाहात रूपांतर होते, त्यासाठी विचारांनी लोक एकत्र आले पाहिजेत. विश्वासाने त्यांनी एकमेकांचे हात हातात घेतले पाहिजेत. तसे हात हातात घेतले; तर बलाढ्य सत्तेलासुद्धा ते हरवू शकतात, हे रायगडच्या सेझविरोधी आणि कोल्हापूरच्या टोलविरोधी आंदोलनांनी सिद्ध केले आहे. त्यामुळे जागतिकीकरणानं निर्माण केलेल्या आव्हानांना नकार देताना, काय नाकारायचं याचं स्वच्छ भान आपल्याकडे असलं पाहिजे. अनेकदा एक व्यवस्था नाकारता नाकारता आपण पुन्हा नव्याने एक नवी व्यवस्था निर्माण करीत जातो. तिच्यातल्या चुकीच्या गोष्टींच्या समर्थनातून ती बळकट करतो आणि मग त्यातूनही नवे प्रश्न निर्माण होतात, याची जाणीव आपणाला असली पाहिजे. भविष्यकालीन पडझड सावरायची असेल, तर एकमेकांना समजून घेऊन परस्परांचे हात विश्वासाने हातात घ्यावेच लागतील. पाय रोवून ठामपणे उभे राहावे लागेल आणि जे जे चांगले ते ते सोबत घेऊन पुढे जावे लागेल. विचारांशी बांधिलकी स्वीकारून, संविधानावर विश्वास ठेवून लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या किंवा समान प्रश्नांवर आपापल्या कुवतीने सामान्य माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावरचा संघर्ष करणाऱ्या छोट्या छोट्या चळवळी आजही जिवंत आहेत. त्यांचे स्वरूप आज क्षीण असले तरी लढण्याची उमेद त्यांनी गमावलेली नाही. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी उद्याच्या काळात याच चळवळींची भूमिका निर्णायक ठरणार आहे. 'एकी कोठाचे बैल भांडति : जुंझेति : परि कुसीसी कुस लाउनि बैसेति :' या लीळाचरित्रातील चक्रधरांच्या दृष्टान्ताप्रमाणे स्वत:च्या कुवतीने वेगवेगळ्या प्रश्नांवर वेगवेगळ्या लढणाऱ्या या चळवळी स्वतंत्रपणे न लढता मतभेदाचे मुद्दे बाजूला ठेवून किंवा कायम ठेवूनही 'किमान समान कार्यक्रमा'वर एकत्रित आल्या, हातात हात घालून ठामपणे उभ्या राहिल्या आणि आपला 'एकसूत्री-मध्यवर्ती आवाज' त्यांनी मोठा केला, तर परिघाबाहेरील वंचित माणसांच्या जीवनातली खऱ्या स्वातंत्र्याची पहाट फार लांब असणार नाही. ती पहाट लवकरच उगवेल; अशी आशा या निमित्ताने करूया.

●

**जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने**
संपादक : एकनाथ पाटील
नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर
पृष्ठे : ४१६, मूल्य : ३५० रु.

**'वाटसरू' सोलापुरात**

***प्रोग्रेसिव्ह बुक सेंटर***
*शॉप नं. १०, युनायटेड रेसिडेन्सी,*
*१५९, रेल्वे लाईन, सोनामाता*
*शाळेसमोर, सोलापूर-४१३००३.*
*दू. ९४२२६४५०५५*